प्रेसनोट

दि. २६/०६/२०२४

सजा - खांडशी, ता. मावळ, जि. पुणे येथील तलाठीवर लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. २१३/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३९ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | अंकुश रामचंद्र साठे, वय ४३ वर्ष, पद - तलाठी, सजा - खांडशी, ता. मावळ, जि. पुणे (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | १०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १०,०००/- रुपये (दहा हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. १९/०६/२०२४ व दि. २५/०६/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. २५/०६/२०२४ |

ठिकाण :- दिनांक २५/०६/२०२४ रोजी कार्ला मंडल कार्यालयात, ता. मावळ, जि. पुणे

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे शेतकरी असून, त्यांचे शेतजमीनीच्या सातबारा उता-यावर असलेली गिनी गवताची नोंद कमी करुन, तसा दुरुस्त सातबारा उतारा देण्यासाठी लोकसेवक अंकुश साठे यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रुपयांची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. येथे दिली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक अंकुश साठे यांनी तक्रारदार यांचेकडे वरील काम करुन देण्यासाठी पंचासमक्ष तडजोडीअंती १०,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, लोकसेवक अंकुश साठे यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये १०,०००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.